**विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर** (अधिकारप्रदत्त स्वायत्त संस्था)

**महत्वाची सूचना**

**( सर्व स्टाफ व विद्यार्थ्यांसाठी )**

**No.NB/**1898 **/२०२५-२६** **दि. १८.०२.२०२६**

---

ज्युनिअर व सिनिअर महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, विद्यार्थी, विद्यार्थिनी व प्रशासकीय कर्मचारी यांना सूचित करण्यात येते की, यु.जी. व पी.जी. इतिहास विभागाच्या वतीने **गुरुवार दि १९.०२.२०२६ रोजी "छत्रपती शिवाजी महाराज जयंती"** निमित्त सकाळी ठीक ९.१५ वाजता प्रतिमापूजनाचा कार्यक्रम ऑफिस समोर आयोजित करणेत आला आहे. तरी सर्वांनी उपस्थित राहावे.

**डॉ. एस. पी. थोरात**
**प्र. प्राचार्य**
**विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर**
**(अधिकारप्रदत्त स्वायत्त संस्था)**



"ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षणप्रसार"
-शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे,
विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर
(अधिकारप्रदत्त स्वायत्त)

## इतिहास विभाग

## अहवाल : छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त प्रतिमापूजन कार्यक्रम

२१/२/२०२६

महाविद्यालयातील इतिहास विभागामार्फत छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त प्रतिमापूजनाचा कार्यक्रम उत्साहात पार पडला. या कार्यक्रमास प्राध्यापक, विद्यार्थी, विद्यार्थिनी तसेच प्रशासकीय कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या प्रसंगी प्राचार्य डॉ. एस. पी. थोरात यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. कार्यक्रमाची प्रस्तावना इतिहास विभागप्रमुख डॉ. एस. आर. कट्टीमनी यांनी केली. त्यांनी आपल्या भाषणातून शिवाजी महाराजांच्या कार्याचे महत्त्व स्पष्ट करताना स्वराज्य, न्यायनिष्ठा, शिस्त आणि लोककल्याणकारी राज्यकारभार हे त्यांच्या नेतृत्वाचे प्रमुख आधारस्तंभ असल्याचे सांगितले. त्यांनी विद्यार्थ्यांना शिवाजी महाराजांच्या धैर्य, दूरदृष्टी आणि संघटन कौशल्याचा आदर्श जीवनात अंगीकारण्याचे आवाहन केले.इतिहास विभागातील डॉ. अनिल जांभळे यांनी 'शिवचरित्रातून घडणारी नवयुगातील तरुण पिढी' या विषयावर मनोगत व्यक्त करताना आजच्या तरुणांनी केवळ इतिहास जाणून घेणे नव्हे, तर त्यातील मूल्ये आचरणात आणणे आवश्यक असल्याचे नमूद केले. त्यांनी सांगितले की, शिवाजी महाराजांचे नेतृत्व हे केवळ युद्धापुरते मर्यादित नसून ते सामाजिक न्याय, स्त्री सन्मान आणि धर्मनिरपेक्षतेवर आधारित होते. त्यामुळे आजच्या तरुणांनी जबाबदारी, देशप्रेम आणि नैतिकता यांचा स्वीकार करून समाजनिर्मितीत सक्रिय भूमिका बजावावी. कार्यक्रमाच्या शेवटी डॉ. अश्विनी खवळे यांनी आभार प्रदर्शन करताना कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सर्व प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थ्यांचे मनःपूर्वक आभार मानले.

डॉ. एस. आर. कट्टीमनी

विभाग प्रमुख
इतिहास विभाग,
विवेकानंद कॉलेज कोल्हापूर.
(अधिकारप्रदत्त स्वायत्त)

# शिवजयंती- १९ फेब्रुवारी,२०२६














शुक्रवार, २० फेब्रुवारी २०२६ MY कोल्हापूर पुढारी ७

# छत्रपती शिवाजी महाराज यांना मानाचा मुजरा

## व्याख्याने, पोवाड्यांसह विविध उपक्रमांनी शहर परिसरात जयंती सोहळा उत्साहात






१) कोल्हापूर : जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या शाहुपुरी येथील केंद्र कार्यालयात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. २) शिवछत्रपतींच्या पाच गडकोटांवरील माती व पाण्यापासून मूर्तिकार सतीश ... मूर्ती.

### महानगरपालिकेत शिवरायांना अभिवादन



कोल्हापूर : नर्सरी बागेतील शाहूकालीन छत्रपती शिवाजी महाराज मंदिरातील शिवजयंती सोहळ्यात पाळण्याची आरती करताना खासदार शाहू महाराज व यशराजराजे. सोबत छत्रपती घराण्याचे ट्रस्टचे पदाधिकारी. (छाया : मिलन मकानदार)

### नर्सरीबाग शिवमंदिरात शिवजन्मकाळ; लवाजम्यासह पालखी सोहळा उत्साहात

### विवेकानंद महाविद्यालय

विवेकानंद महाविद्यालय इतिहास विभागाच्या वतीने डॉ. एस. पी. थोरात यांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन करण्यात आले. पन्हाळा येथे आयोजित पदयात्रेमध्ये महाविद्यालयातील एन. एस. एस. स्वयंसेवक व एन. सी. सी. विभागातील छात्र व प्रा. कॅप्टन सुनीता भोसले, प्रा. डॉ. संदीप पाटील उपस्थित होते. इतिहास विभागातील प्रा. डॉ. अनिल जांभळे यांनी छत्रपती शिवरायांविषयी मनोगत व्यक्त केले. इतिहास विभाग प्रमुख डॉ. एस. आर. कट्टीमनी यांनी स्वागत केले. याप्रसंगी प्रा. डॉ. अश्विनी खवळे यांनी कार्यक्रमाचे आभार व्यक्त केले.

2026.02.20 07:20

---

पुण्य नगरी ■ शुक्रवार, २० फेब्रुवारी २०२६

# शहरात जयघोष

**कोल्हापूर :** शिवजयंतीनिमित्त शहरात विविध संस्था, संघटना, कार्यालयांमध्ये छत्रपती शिवाजी महाराजांचा जयघोष करण्यात आला.

**विवेकानंद कॉलेज :** विवेकानंद कॉलेजमध्ये इतिहास विभागातर्फे छत्रपती शिवाजी महाराज जयंतीप्रसंगी डॉ. एस. पी. थोरात यांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन करण्यात आले. प्रास्ताविक इतिहास विभागप्रमुख डॉ. एस. आर. कट्टीमनी यांनी केले. पन्हाळा येथे आयोजित पदयात्रेमध्ये एनएसएस स्वयंसेवक व एनसीसी विभागातील छात्र, तसेच प्रा. कॅप्टन सुनीता भोसले व डॉ. संदीप पाटील उपस्थित होते. इतिहास विभागातील डॉ. अनिल जांभळे यांनी मनोगत व्यक्त केले. डॉ. अश्विनी खवळे यांनी आभार मानले.